औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची सोमवार दि. २५. ७. १९९४ रोजी झालेल्या ९२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] श्री. ईश्वरराव भोसीकर | सभापती, औरंगाबाद मंडळ. |
| २] श्री. भास्कर मुंढे | उपसभापती, औरंगाबाद मंडळ. |
| ३] श्री. दे. हि. मुन,<br>उपसंचालक, नगररचना विभाग,<br>औरंगाबाद. | सदस्य |
| ४] श्री. व्यंकटराव देशपांडे उर्फ<br>बबरु चारठाणकर | सदस्य |
| ५] श्री. मतीन कादरी,<br>उपअभियंता म. न. पा.<br>आयुक्त, मनपा औरंगाबाद<br>यांचे सदस्य प्रतिनिधी. | सदस्य प्रतिनिधी. |

विषय क्र. १: दिनांक ३१. ५. ९४ रोजी झालेल्या ९१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.

....

दिनांक ३१. ५. ९४ रोजी झालेल्या ९१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत म. उपसभापतींनी मंडळास वाचुन दाखविला व त्यावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५५४

दिनांक ३१. ५. ९४ रोजीच्या ९१ व्या बैठकीतील कार्यवृत्तांवर सविस्तर चर्चा होऊन सदरचा कार्यवृत्तांत कायम करण्यात आला.

विषय क्र. २: महसुली जमा परत करणेबाबत.

म. उपसभापतींनी उक्त विषयाची बाब टिप्पणी मंडळास वाचुन दाखविली व सदर विषयावर विस्तृत चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५५५

महसुली जमा परत करण्याचे अधिकार मंडळास नाहीत तसे अधिकार मंडळास प्रदान करण्याबाबत प्राधिकरणास कळवावे. तसेच ना हरकत प्रमाणपत्र आणि गाळयाच्या नकाशा देण्याकरिता रुपये १००/- फीस आकारण्यांत यावी.

विषय क्र. ३: नगरपरिषद नांदेड यांचेकडून प्राप्त झालेल्या झोपडपट्टी सुधारणा कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

.....

म. उपसभापतींनी मंडळास माहिती दिली की, नांदेड नगरपालिकेने सर्व्हे नं. २८/२९/ब आणि ४२ [अ] ऑफ असदुल्लाबाद-मगणपूरा या झोपडपट्टीच्या सुधारणा कामास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर झोपडपट्टीची लोकसंख्या ३३७२ असून दि. १६ डिसेंबर १९९३ च्या राजपत्रानुसार ही झोपडपट्टी घोषित आहे. नगरपालिकेने सादर केलेले अंदाजपत्रक हे रु. १६,५३,८०३ चे असुन त्यास नियमानुसार रु. १६,५३,८०३ ची प्रशासकीय मान्यता देता येणे शक्य आहे असे म. उपसभापतींनी सांगितले.

नांदेड शहराकरिता सन १९९४-९५या आर्थिक वर्षासाठी रु. ८.०७ लक्षाची तरतुद आहे. सन१९९४-९५ चा आजपर्यन्तचा खर्च निरंक असून सर्व तरतुद शिल्लक आहे.

सदर बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होउन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५५६

नांदेड येथील स.न. २८/२९/ब आणि ४२ [अ] ऑफ असदुल्लाबाद-मगणपूरा या झोपडपट्टीच्या सुधारणा कामास रु. १६,५३,८०३ ची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.

विषय क्र. ४: गेवरराई जि. बीड येथील स.क्र. ५३ [भाग] वरील अल्प उत्पन्न गट अंतर्गत २६६ गाळे, मध्यम उत्पन्न गट-१ अंतर्गत ६८ गाळे व मध्यम उत्पन्न गट-२ अंतर्गत ४१ गाळ्यांच्या योजनेबाबत.

म. उपसभापतींनी या विषयाची बाब टिप्पणी वाचुन दाखविली व मंडळास माहिती दिली की, म. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांची मुंबई येथे भेट घेतली व गेवराई येथील योजनेबाबत सविस्तर चर्चा केली त्यात म. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी सांगितले की, निश्चीत मागणी अभावी प्राधिकरणाचा पैसा योजनांमध्ये गुंतविणे बरोबर होणार नाही. यापुढे म. उपसभापतींनी मंडळास सांगितले की, गेवराई येथील विकसीत भूखंडाची योजना तयार करुन ती प्रशासकीय मान्यतेस्तव प्राधिकरणास पाठविण्यांत यावी असा प्रस्ताव आहे.

चर्चेत भाग घेतांना म. सभापतींनी सांगितले की, हडकोच्या नविन नॉर्म प्रमाणे अल्प उत्पन्न गटातील गाळ्याच्या भूखंडाचे क्षेत्रफळ वाढवावे किमान७०० ते ८०० चौ. फुटा एवढा भूखंड ठेवावा व त्याप्रमाणे योजना सुधारीत करुन पहावे व लोकांना त्याची कल्पना द्यावी.

मंडळाच्या सदस्यांनी चर्चेत भाग घेतांना असे प्रतिपादन केले की, गेवराई येथे विकसीत भूखंडाची योजना राबविण्या अगोदर पुन्हा एक वेळ सर्वस्तरावरुन प्रयत्न करण्यांत यावे व नंतरच विकसीत भूखंडाची योजना राबविण्याचा विचार करावा.

श्री. व्यंकटराव देशपांडे सदस्य औरंगाबाद मंडळ यांनी बैठकीत सांगितले की, गेवराई येथील योजनेस प्रतिसाद मिळवून देण्याची कामगिरी माझ्याकडे सोपवावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५५७

गेवराई येथील गृहनिर्माण योजना कार्यान्वीत करण्यासाठी कमीत कमी ५० गाळ्यांसाठी मागणी नोंदविण्यासाठी प्रयत्न करण्यांत यावा व विकसीत भूखंडाची योजना तयार करण्याचे काम सध्या स्थगित ठेवण्यांत यावे.

विषय क्र. ५: वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करणेबाबत.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५५८

श्री. आर. एस. गोराडे यांनी त्यांच्या आईच्या आजारावर खाजगी रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून औषधोपचार केलेल्या खर्चाची रक्कम रु. १४१६/- च्या अदायगीस प्राधिकरणाच्या नियमाच्या अधिन राहून वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करण्यास मंडळाने मंजूरी दिली.

विषय क्र. ६: सिडकोस " विकास भार" रक्कम भरणेबाबत.

म. उपसभापतींनी मंडळास सदर विषयाची बाब टिप्पणी वाचुन दाखविली व त्यावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५५९

आर-२८ सिडको येथील५२८.०० चौ. मी व २३३.७५ चौ. मी या भूखंडावर १२ उच्च व ६ मध्यम उत्पन्न गट गाळ्यांच्या योजनेस सिडकोकडून बांधकाम परवाना प्राप्त करण्यासाठी " विकास भार" हरकत नोंदऊन भरण्यात यावा व त्यास मंजूरी मिळविण्यात यावी. जर शासनाने " विकास भारातुन" सुट दिल्यास मंडळाने भरलेला विकास भराची रक्कम सव्याज सिडकोकडून परत घ्यावी.

विषय क्र. ७:

औरंगाबाद मंडळातील कनिष्ठ लिपिकांना सेवानिवासस्थान वाटप करणेबाबत.

म. उपसभापतींनी मंडळास सदर विषयाची बाब टिप्पणी वाचुन दाखविली व मंडळास माहिती दिली की, औरंगाबाद मंडळातर्फे सिडको येथे १५ गाळे प्रायोगिक तत्वावर बांधले आहेत, त्यापैकी १० गाळे मंडळाच्या कर्मचा-यांना वाटप करण्यांत आलेले आहे व ५ गाळे शिल्लक आहेत. या ५ गाळ्यांवर मंडळाच्या मध्यम उत्पन्न गटातील कर्मचा-यांची मागणी नाही. त्यामुळे सदर गाळे वाटप केलेले नाही. परंतु मंडळाच्या कनिष्ठ लिपिकांनी रिक्त असलेल्या ५ गाळ्यापैकी मागणी केलेली आहे. परंतु त्यांचे उत्पन्न मध्यम उत्पन्न गटात बसत नाही त्यामुळे सदर गाळे वाटप करण्यास मंडळास अडचण निर्माण झालेली आहे. सदरचे गाळे रिक्त असल्यामुळे म्हाडाचे आर्थिक नुकसान होत आहे व त्या गाळ्यात घुसखोरी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मंडळाच्या सदस्यांनी चर्चा करतांना असे मत प्रदर्शित केले की, म्हाडाच्या हितार्थ हे रिक्त असलेले गाळे मंडळाच्या कनिष्ठ लिपिकांना वाटप करण्यांत यावे.

यावर सविस्तरचर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५६०

औरंगाबाद मंडळाने बांधलेल्या १५ गाळ्यापैकी रिक्त असलेले ५ गाळे मंडळाच्या कनिष्ठ लिपिकांना विशेष बाब म्हणून व म्हाडाचे आर्थिक हित लक्षात घेता वाटप करण्यास मंडळाने मान्यता दिली. ही बाब कार्योत्तर मंजूरीसाठी प्राधिकरणास पाठवीनेत यावी.

विषय क्र. ८: औरंगाबाद मंडळाच्या कार्यालयीन इमारतीच्या रक्षणासाठी सेक्युरिटी सर्व्हीसेस नेमणेबाबत.

....

उक्त विषयाची बाब टिप्पणी म. उपसभापतींनी मंडळास वाचुन दाखविली व सेक्युरिटी गार्डस नेमण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची कल्पना दिली.

ठराव क्र. ५६१.....

औरंगाबाद मंडळाच्या कार्यालयीन इमारतीच्या रक्षणासाठी नेमलेल्या सेक्युरिटी सर्व्हिसेस बाबत मंडळाचे नोंद घेतली.

विषय क्र. ९: मा. सभापतींच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

विषय क्र. १: तिसगांव येथील ग. न. १०४/१ या जमिनीवरील प्रस्तावित गृहनिर्माण योजना कार्यान्वीत करणेबाबत.

....

सदर विषयाची बाब टिप्पणी कार्यकारी अभियंता औरंगाबाद यांनी मंडळास वाचुन दाखविली. त्यावर चर्चा करतांना मंडळाच्या असे निदर्शनास आले की, तीसगांव येथील १०४/१ या जमिनीवरील प्रस्तावित योजना कार्यान्वीत करण्यासाठी प्रामुख्याने दोन अडचणी आहे.

१] स्टोन क्रशर [२] पाणीपुरवठा

मंडळाचे सदस्य श्री. व्यंकटराव देशपांडे उर्फ बबरु वारठाणकर यांनी अशी विचारणा केली की, क्रशर खाली असलेली जमिन ही मंडळाच्या ताब्यात आली का व त्या जमिनीचे मंडळातर्फे पैसे भरण्यांत आले आहे का ?.

यावर म. उपसभापतींनी सांगितले की, स्टोन क्रशर खाली असलेल्या जमिनीचे पैसे मंडळातर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे भरलेले आहे. परंतु क्रशर खालील जमिनीचा ताबा मंडळास मिळालेला नाही. यावर चर्चा करतांना म. उपसभापतींनी सांगितले की, क्रशर हटविण्यासाठी जिल्हाधिकारी यांचेकडे बराच पत्रव्यवहार झालेला आहे व प्रत्यक्षात जावुन जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा केली आहे. क्रशरमुळे मंडळास गृहनिर्माण योजना कार्यान्वीत करता येत नाही असे वारंवार त्यांना सांगण्यांत आलेले आहे. क्रशरवाल्याचा लिजपिरियड संपलेला आहे व काही क्रशर बंद असल्याचे म. उपसभापतींनी मंडळास सांगितले.

म. सभापतींनी या विषयावर चर्चा करतांना अशया सूचना केल्यात की, क्रशर स्थलांतरीत करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना पुन्हा विनंती करण्यांत यावी व क्रशरच्या धुळीमुळे आणि प्रदुषणामुळे योजना कार्यान्वीत करणे मंडळास शक्य नाही. त्यामुळे या योजनेतील लाभधारक मंडळाकडे आपली घरे मिळण्यासाठी सारखा तगादा लावत आहे. क्रशरवाल्यांचा लिजपिरियड संपल्याने उर्वरीत जमिन मंडळाच्या ताब्यात देण्याविषयी विनंती करावी.

तसेच पाणीपुरवठया अभावी योजना कार्यान्वीत करणे मंडळास शक्य नाही. स. न. १०४/१ या जमिनीवरील योजनेस सिडकोकडून बांधकाम परवानगी घेतांना मंडळाने सिडकोकडे एक कोटी सतरा लाख रुपये भरले आहे. परंतु त्यांचेकडून डिसेंबर १९८६ अखेरपर्यन्त पाणी उपलब्ध होईल असे कळविले आहे. पाणीपुरवठा उपलब्ध करणेसाठी वरिष्ठ भुवैज्ञानिक यांचेमार्फत भुजलसर्वेक्षण करण्यांत आलेले आहे व त्यांनी तेथे पाणी लागणार नसल्याचा अभिप्राय दिलेला आहे.

म. उपसभापतींनी मंडळास आणखी माहिती दिली की, तीसगांव येथे मंडळाच्या जमिनीजवळ श्री. तापडीया यांची विहीर आहे त्या विहीरीस पाणी चांगले आहे. श्री. तापडीया यांच्याशी पाणी पुरवठयाविषयी चर्चा केली असता त्यांनी एक पाण्याची टाकी म्हाडा व तापडीया यांच्यात सामाईक बांधून पाणीपुरवठा करता येईल असे सांगितले.

मंडळाच्या सदस्यांनी चर्चा करतांना असे प्रतिपादन केले की, श्री. तायडोया यांच्या विहीरीची पाहणी करून त्यांच्याशी सविस्तर चर्चा करावी.

म. सभापतींनी या संदर्भात असे सुचविले की, मुख्य अधिकारी व कार्यकारी अभियंता यांनी तोसगांव येथील जमिनीवरील कुंपण हटविण्यासाठी व जमिन ताब्यात घेण्याविषयी तसेच पाणीपुरवठा उपलब्ध करण्याच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करावी व तसे अधिकार त्यांना देत आहे. यास सर्व सदस्यांनी सम्मती दर्शविली.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५६२

तोसगांव येथील स.न. १०४/१ या शासकीय जमिनीतील उर्वरीत जमिन ताब्यात घेण्याविषयी व कुंपण हलविण्यासाठी जिल्हाधिकारी यांना विनंती करावी. तसेच पाणीपुरवठ्याच्या अनुषंगाने उपसभापतींनी श्री. तायडोया यांच्याशी चर्चा करावी आणि वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचाही अहवाल घ्यावा.

....

बैठकीच्या शेवटच्या क्षणी म. श्री. व्यंकटराव देशपांडे सदस्य औरंगाबाद मंडळ यांनी परभणी येथील एसआरटी, डीआरटी वसाहतीतील मोकळ्या जागेचा प्रश्न उपस्थित केला त्यावर चर्चा करण्यांत आली व म. सभापतींनी अशी सूचना केली की, या विषयाची सविस्तर माहिती मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवण्यांत यावी.

पटलावरील विषय संपल्यानंतर उपस्थितांचे आभार मानून बैठक संपली.

....